## **बृहन्मुंबई महानगरपालिका**
## **जाहिरातीचा नमुना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ‘सार्वजनिक आरोग्य खाते’ या विभागाच्या आस्थापनेवरील ‘सहाय्यक वैद्यकीय अधिकारी’ या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली पदे भरण्यासाठी निवडयादी तयार करावयाची असल्याने खाली नमूद केलेली अर्हता धारण करणा-या व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यामध्ये वैयक्तिक माहितीपत्रासह तसेच सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रतींसह अर्ज करावा.

**अर्ज पाठविण्याचा पत्ता :-कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, ३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई-४०००१२.**

**अर्ज सादर करण्याची तारीख:- दि.१४.११.२०१९ ते दि.२५.११.२०१९ या कालावधीत सकाळी १०.३० ते सायं.५.३० या कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.**

**पदाचे नाव : सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (वर्ग -ब), रिक्त जागा – १३६**

**वेतनश्रेणी :** रु.९३००-३४८०० अधिक रु.५४००/- श्रेणीवेतन अधिक अनुज्ञेय भत्ते.(६ व्या वेतन आयोगानुसार)

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई.बी.सी | ई.डब्ल्यू.एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | ७ | ६ | १ | ३ | ३ | ४ | ३ | २७ | १२ | ९ | १३ | ८८ |
| **महिला ३०%** | ४ | ३ | १ | १ | १ | २ | १ | १२ | ५ | ४ | ६ | ४० |
| **खेळाडू ५%** | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | १ | ७ |
| अनाथ **१%** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **एकुण** | १२ | १० | २ | ४ | ४ | ६ | ४ | ४१ | १८ | १४ | २१ | १३६ |
| दिव्यांग **४%** | | | दिव्यांग करीता ०५ पद आरक्षित असून सदर संवर्गाच्या दिव्यांगाच्या पदनिश्चितीस शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर पदे स्वतंत्ररित्या जाहिरात देऊन भरण्यात येतील. यास्तव, दिव्यांगांसाठी आरक्षित होणारी ०५ पदे खुल्या गटातून रिक्त ठेवण्यात येतील. | | | | | | | | | |

**शैक्षणिक अर्हता :-**

१.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस.पदवीधारक असावा.

२.महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३.उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय (उच्चतर/निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा. तथापि, त्याप्रमाणे नसल्यास त्यांना मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा महापालिका प्रशासनातर्फे घेण्यात येणारी मराठी भाषेची परीक्षा नियुक्ती पासून २ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत उमेदवाराची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असेल उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा मराठी भाषा हा विषय घेऊन प्रथम वाषिक वेतनवाढ मिळण्यापूर्वी उत्तीण न झाल्यास त्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात येणार नाही. तथापि, उमेदवार नियुक्ती पासून २ वर्षाच्या कालावधीत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाले तर त्यांना देय असलेली वार्षिक वेतनवाढ मराठी

भाषेची परिक्षा उत्तीर्ण झाल्यापासून पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात येईल. सदर उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा मराठी भाषा घेऊन नियुक्तीपासून २ वर्षाच्या कालावधीत उत्तीर्ण न झाल्यास त्यांची सेवा खंडीत करण्यात येईल.

४.उमेदवाराला संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक आहे.त्याने/तिने 'डी.ओ.ई.ए.सी.सी' सोसायटीची 'सी.सी.सी.' ही संगणकाची परिक्षा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा बी स्तर' किंवा 'सी स्तर' उत्तीर्ण केलेली असावी अथवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण मंडळाची एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळेस उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तीने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी ही परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**वयोमर्यादा :-**

- खुल्या प्रवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय दि.०१.११.२०१९ रोजी **खुल्या प्रवर्गासाठी** ३८ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. मागास प्रवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय ४३ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.
- अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही.
- दिव्यांग उमेदवाराच्या बाबतीत महाराष्ट्र शासन निर्देशानुसार वयोमर्यादा १८ वर्ष ते जास्तीत जास्त ४५ वर्ष राहील.
- शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.
- माजी सैनिकांना सेवेमध्ये वयोमर्यादा सवलत शासन निदेशानुसार प्रकरण परत्वे लागू करण्यात येईल.

**निवडीचे निकष :**

सर्वदृष्टीने परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अर्हताप्राप्त उमेदवाराने अंतिम वर्षाच्या एम.बी.बी.एस.परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या टक्केवारीनुसार निवड यादी तयार करण्यात येईल. समान गुण धारण करणा-या उमेदवारांना जन्म तारखेनुसार वयोज्येष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल. परदेशातील विद्यापीठातून एमबीबीएस पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**निवडीची कार्यपध्दती :-**

१. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील.

२. अर्ज केलेल्या उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या तक्त्यातील वेळापत्रकानुसार **कस्तुरबा रुग्णालय, साने गुरुजी मार्ग, चिंचपोकळी (पश्चिम) मुंबई-११** येथे सर्व मुळ प्रमाणपत्रांसह पडताळणीकरीता उपस्थित रहावे.

| अ.क्र | प्रवर्गाचे नाव | तारीख व वेळ |
|---|---|---|
| १ | अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र, | **दि.०९.१२.२०१९** रोजी स.११.०० ते दु.१.०० पर्यंत |
| २ | खुला, इमाव, सा.शै.मा.व (SEBC). आ.दु.घ.(EWS) | **दि.०७.१२.२०१९** रोजी स.११.०० ते दु.१.०० पर्यंत |

३. सहाय्यक वैद्यकिय अधिकारी या संवर्गाची अर्हता व सर्व अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांची, गुणवत्तेनुसार तसेच रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार व मागासवर्गीयांच्या आरक्षणानुसार निवड यादी प्रसृत करण्यात येईल. निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नविन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल या दिनांकापर्यंत विधिग्राह ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

४. तसेच गुणवत्तेनुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी :-**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. जाहिरातींमध्ये दिलेल्या पदाची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.
3. वैयक्तिक माहितीपत्र (Bio-Data) स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावे. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण वैयक्तिक माहितीपत्र विचारात घेतले जाणार नाहीत.
4. अगोदरच बृहन्मुंबई महापालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला वर नमूद केलेल्या पदाच्या भरतीसाठी उपस्थित रहावयाचे असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खातेप्रमुखांचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.
5. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या तीन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.
6. वैयक्तिक माहितीपत्रासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या A-4 आकारातील ) असावे.
7. उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
8. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.
9. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.
10. उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला / अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे/ व्यावसायिक अर्हता/ संबंधित गुणपत्रिका/ सक्षम अधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र असल्यास/ जात वैधता प ्रमाणपत्र असल्यास, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र यांच्या छायांकित साक्षांकित प्रती वैयक्तिक माहितीपत्रासोबत (Bio-Data) जोडणे आवश्यक आहे. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प ्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. अंतिम वर्षाची एम.बी.बी.एस. पदवी परिक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र (Attempt Cft.) सादर करणे आवश्यक आहे.
11. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो / ती भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.
12. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या १ महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र (Surety Bond) सादर करावे लागेल. सदर अनामत रक्कम भरुन सुध्दा उमेदवाराने महापालिकेमध्ये नोकरी न स्विकारल्यास अथवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास अनामत रक्कम परत मिळण्याचा उमेदवारास हक्क राहणार नाही.

13. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
14. पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर राहणार नाही.
15. रिक्त पदांच्या तुलनेत जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेतील गुणवत्तेनुसार कपात यादी तयार करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.
16. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालय/ दवाखाने/ रुग्णालयात बदलीयोग्य असेल.
17. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रदबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
18. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम १९९९ लागू होतील.
19. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम १९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.
20. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.
21. विजा(अ), भज(ब), भज(क), भज(ड), या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.
22. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.
23. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र.बीसीसी/२०११/ प्रक्र/१०६४/११/१६ब दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने **जात वैधता नसल्यास त्याने** त्याचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.
24. निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.
25. उमेदवारांना भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
26. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र" आणावे.
27. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार माननीय महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
28. समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायाप्रती आणणे आवश्यक आहे.
29. खेळाडुंनी शासन निर्णय क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रियूसे-२ दि.०१.०७.२०१६ व तद्नंतर सुधारीत निर्णयानूसार व परिपत्रक क्र.एमपीएम/2/1260 दि.21.03.2017 नुसार गट-ब साठी क्रिडा विषयक अर्हता प्राप्त

केल्याचे प्रमाणपत्र संचालक क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केले असावीत. ते प्रमाणपत्र विधीग्राहय नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

30. खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच सुधारीत तरतूदी नुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उप-संचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

31. खेळाडुंनी शासन निर्णय क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रियूसे-२ दि.०१.०७.२०१६ मधील 6(i) नुसार शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये गट 'ब' साठी नमूद असलेल्या पात्र क्रिडा / स्पर्धा खालीलप्रमाणे आहेत.

<u>गट-ब साठी पात्र क्रीडा स्पर्धा-</u>

गट-अ पदाकरीता विहीत केलेले खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू

<u>गट-अ साठी पात्र क्रीडा स्पर्धा-</u>

१) अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा - ऑलिम्पिक क्रिडा स्पर्धा, एशियन्स गेम्स, जागतिक क्रिडा स्पर्धा, एशियन चॅम्पियनशीप, कॉमनवेल्थ गेम्स, कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप, यूथ ऑलिम्पिक, ग्रॅन्ड मास्टर बुध्दीबळ,

२) पॅरॉलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा- पॅरॉलिम्पिक गेम्स, पॅरा एशियन गेम्स, वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स,

३) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा- जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ,

४) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा- आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित केलेले खेळ,

५) ग्रॅन्ह मास्टर किताब

(टिप- उपरोक्त नमूद अ.क्र. 1, 3 व 4 या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रिडा स्पर्धा, एशियन्स गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांचा समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच 5% आरक्षणासाठी पात्र राहतील.)

<u>अथवा</u>

१) अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातीलः- ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशीप, युथ कॉमनवेल्थ गेम्स, कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप, कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप, आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बध्दीबळ)

२) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गटः- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट)

३) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धाः- पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा

४) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा

५) राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा

६) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा

७) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा

टिपः- अ.क्र. l, 2, 4, 5 व 6 या स्पर्धांमधील ऑलिम्पिक क्रिडा स्पर्धा, एशियन्स गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच 5% आरक्षणासाठी पात्र राहतील.)

32. महिलांचे आरक्षण, महिला व बालकल्याण विभागाच्या शासन निर्णय क्र. ८२/२००१/मएसा/२०००/ प्र. क्र.४१५/का-२, दि.२५.०५.२००१ मधील तरतूदीनुसार राहिल. शासन निदेशानुसार महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद पुरुष उमेदवारामधून भरण्यात येईल.

33. शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2018/ प्र.क्र.581 ए/ 16-ब दि.04.07.2019 व परिपत्रक क्र.एमबीसी/ 4584 दि.02.08.2019 नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरीता 13% आरक्षण लागू करण्यात येईल.

34. शासन निर्णय क्रमांक बीसीसी 2019/ प्र.क्र.118 ए/ 2019/ 16-ब दि.16.02.2019 व परिपत्रक क्र.एमबीसी/ 3217 दि.07.03.2019 नुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटक करीता 10% आरक्षण लागू करण्यात येईल.

35. शासन निर्णय क्रमांक अनाथ-2018/ प्र.क्र.182/का-03 दि.20.08.2019 नुसार अनाथ उमेदवारांसाठी 1% आरक्षण लागू करण्यात येईल.

**विशेष सूचना:-**

१. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

२. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

३. मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

४. सेवायोजन कार्यालय / प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहिरातीनुसार अर्जासह आणि आवश्यकत्या प्रमाणपत्रांच्या मूळ व साक्षांकित प्रतीसह हजर राहणे आवश्यक आहे.

सही/-

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

**सहाय्यक वैद्यकिय अधिकारी या पदाकरिता सादर करावयाचा अर्ज.**

**वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)**

| |
|---|
| उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले<br>पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून<br>फोटोवर स्वाक्षरी करावी<br>२.५ से.मी. X ३ सें.मी. |

१. (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम ) (मराठीत) : ----------------------------------------------

(ब) वडिलांचे /पतीचे संपूर्ण नांव : ----------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता ) : --------------------------------------------

२. अ)पत्ता (पोस्टल पिनकोडसह) : ------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

ब) दूरध्वनी क्रमांक (एसटीडी क्रमांकासह) [ ] भ्रमणध्वनी [ ]

क) ई-मेल आयडी [ ]

३. लिंग : पुरुष [ ] स्त्री: [ ]

४. उमेदवार मागासवर्गीय आहे का?

अ) प्रवर्ग ------------------- जात :------------------- : पोटजात -------------------

ब) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र : आहे/ नाही

क) जात वैधता प्रमाणपत्र : आहे / नाही

ड) जात प्रमाणपत्र : आहे /नाही

५. समांतर आरक्षण: उमेदवार महिला / खेळाडू / अनाथ/ सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक

आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छितो का ? : हो / नाही

६. अ)जन्मदिनांक : दिनांक महिना वर्ष

| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) दि. / /२०१९ रोजी असलेले वय --------------वर्षे ------------महिने ------------- दिवस

७. शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा मंडळ / विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | एस.एस.सी./एच.एस.सी. परिक्षेतील मराठी विषयातील गुण | | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | मराठी विषयातील प्राप्त गुण | पैकी | |
| एस.एस.सी. | | | | | | | |
| एच.एस.सी. | | | | | | | |
| एम.बी.बी.एस. पदवी | | | | | | | |
| महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत आहे का ? | | | | | | | |

एम.बी.बी.एस. पदवी परिक्षेच्या सर्व गुणपत्रिका तसेच Attempt Cft. जोडणे आवश्यक आहे.

८. संगणकविषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे/नाही

९. अनुभव (प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.) :

१०.स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता. : ——————————————————

——————————————————

११.अ)उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? होय/नाही.

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

क) उमेदवारा विरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? असल्यास तपशील द्यावा.

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी------------------- पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू,

दिनांक : अर्जदाराची सही/-

ठिकाण : (अर्जदाराचे नाव)

सोबत : १)

२)

३)